# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

**Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in,Phone No.: 020-25621440**


## सुधारित परिपत्रक क्र.६४/२०२६

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ च्या परीक्षा आयोजनाबाबत.**

विद्यापीठ अधिकार मंडळांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्याशाखांतील सर्व अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्र २०२६ च्या परीक्षा आयोजनाबाबतची मार्गदर्शक तत्त्वे व सूचना खालीलप्रमाणे :

**१.** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उन्हाळी सत्र २०२६ च्या प्रथम वर्षातील (उन्हाळी सत्र परीक्षाः प्रथम वर्ष अ., औ., स्था. व वि. वगळून) सर्व अभ्यासक्रमांच्या अंतर्गत मूल्यमापन परीक्षांचे आयोजन **दिनांक १६.०३.२०२६ ते दिनांक ३१.०३.२०२६ या कालावधीत** महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर करावे. अंतर्गत मूल्यमापनाचे गुण भरण्यासाठी परिपत्रक व लिंक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

**२.** उपरोल्लेखित प्रथम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी, औषधनिर्माण, स्थापत्य व विधी अभ्यासक्रम तसेच बी.बी.ए. यासारख्या सी.ई.टी.मार्फत उशिरा प्रवेश होणारे अभ्यासक्रम वगळून) उन्हाळी सत्र २०२६ मधील प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन **दि. १६.०३.२०२६ ते दि. ३१.०३.२०२६** या कालावधीत करावे. या प्रथम वर्षातील प्रात्यक्षिक परीक्षांसाठी बहिःस्थ परीक्षक इतर महाविद्यालयातून रीतसर नियुक्त करावेत आणि विद्यापीठ नियमानुसार या प्रात्यक्षिक परीक्षा महाविद्यालयामार्फत आयोजित कराव्यात. क्षेत्रीय प्रकल्प **(Field Project)** चे मूल्यमापन अंतर्गत असून त्यासाठी बहिस्थ परीक्षक नेमू नये.

**३.** विज्ञानशाखा वगळता कला, व वाणिज्य-व्यवस्थापन या शाखेतील अभ्यासक्रमांच्या एनईपी-२०२० संरचनेअंतर्गत अभ्यासपत्रिकांतील प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करावे. (गणित, संख्याशास्त्र व भूगोल इ. विषय वगळता)

तसेच विद्यापीठ आयोजित परीक्षांपैकी खालील अभ्यासक्रमांच्या विद्यापीठ स्तरावरील प्रात्यक्षिक/प्रकल्प परीक्षा, प्रात्यक्षिक/प्रकल्प परीक्षांची मार्गदर्शक तत्त्वे व नियमावली निश्चित होईपर्यंत विद्यापीठ संकेतस्थळावरील प्रसिद्ध परीक्षा-कार्यक्रमपत्रिका व वेळोवेळी प्रसिद्ध होणारी वेळापत्रके विचारात घेवून महाविद्यालयामार्फत घेण्यात याव्यात.

**वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा (वाणिज्य)-** १) बी.कॉम.२०१९ व २०२४ पॅटर्न, २) एम.कॉम २०१९ व २०२३ पॅटर्न, ३) बी.बी.ए., बी.बी.ए.(आय.बी./सी.ए.), २०१९ पॅटर्न, ४) बी.कॉम. (बी.एम./सी.ए./आय.बी.) २०२४ पॅटर्न.

**वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा (व्यवस्थापन)-१)** बी.बी.ए., बी.बी.ए.(आय.बी./सी.ए.), २०२४ पॅटर्न, २) बी.सी.ए. २०२४ पॅटर्न

**मानवविज्ञान विद्याशाखा (कला)-** १) बी.ए. २०१९ व २०२४ पॅटर्न, २) एम.ए. २०१९ व २०२३ पॅटर्न, एम.ए.(मराठी) २०२४ पॅटर्न

**(संदर्भः परिपत्रक क्र.२३६अ/२०२५, जा.क्र.७६९अ, दिनांक ७.१०.२०२५)**

**४.** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सत्रपुर्तता (N+2) झालेल्या विद्यार्थ्यांच्या (हिवाळी सत्र-२०२५ मध्ये अर्ज भरलेले विद्यार्थी) उन्हाळी सत्र परीक्षा २०२६ मधील (+1) सर्व अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक परीक्षांची (अभियांत्रिकी,

औषधनिर्माण, स्थापत्य व विधी अभ्यासक्रम तसेच बी.बी.ए. यासारख्या सी.ई.टी.मार्फत उशिरा प्रवेश होणारे अभ्यासक्रम वगळून) प्रचलित पद्धतीने संपूर्ण कार्यवाही महाविद्यालयामार्फत करण्यात यावी आणि याकरिताची महाविद्यालयनिहाय विद्यार्थ्यांची यादी संबंधित महाविद्यालयांस छाननी व तालिनीकरण कक्षामार्फत कळविण्यात येईल. तसेच ज्या प्रात्यक्षिक परीक्षांची सर्व विद्याशाखांअतर्गच्या कार्यवाही प्रचलित पद्धतीने विद्यापीठ स्तरावर होत आहे, ती त्याप्रमाणेच राहील.

५. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ उन्हाळी सत्र २०२६ च्या प्रथम वर्षातील (अभियांत्रिकी, औषधनिर्माण, स्थापत्य व विधी अभ्यासक्रम तसेच बी.बी.ए. यासारख्या सी.ई.टी.मार्फत उशिरा प्रवेश होणारे अभ्यासक्रम वगळून) सर्व अभ्यासक्रमांच्या **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पूर्वीच्या अनुशेष विद्यार्थ्यांच्या (Backlog Students)** प्रथम वर्ष -प्रथम व द्वितीय सत्राच्या परीक्षा महाविद्यालयामार्फत महाविद्यालय स्तरावर पूर्वीप्रमाणे आयोजित करण्यात येतील. या सर्व अनुशेषअंतर्गत अभ्यासक्रमांच्या परीक्षांकरिता पेपर सेटींग, वेळापत्रक, परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्राचे कामकाज संबंधित महाविद्यालयामार्फत महाविद्यालय स्तरावर करण्यात येईल. एन.ई.पी.-२०२० अभ्यासक्रमांच्या बाबतीत अभ्यासक्रमांत नमूद केल्याप्रमाणे मूल्यमापन गुणोत्तर **३०:७०** राहील आणि प्रश्नपत्रिकाही त्याप्रमाणेच तयार कराव्यात.

६. शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष) परिपत्रक क्र.२६/२०२६, जा.क्र.४८, दिनांक २५.०२.२०२६ नुसार नियमावली सूचना यांचे पालन करावे. विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिकविल्या जाणाऱ्या सर्व विद्याशाखाअंतर्गतच्या सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या **प्रथम वर्ष परीक्षांकरिता** Value Education Course **(VEC)**, Indian Knowledge Systems **(IKS-Generic)**, Field Projects (FP), Community Engagement Programs (CEP) आणि Co-Curricular Courses **(CC)** या व्हर्टीकल्स अंतर्गत येणाऱ्या विषयांचा समावेश केवळ अंतर्गत मूल्यनिर्धारणाकरिता करण्यात आलेला आहे. सदर विषयांच्या सत्रान्तर्गत परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित कराव्यात आणि यापुढे विद्यापीठाद्वारे प्रसिद्ध होणाऱ्या उन्हाळी सत्र २०२६ च्या सत्रान्त परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये सदर विषयांचा समावेश असणार नाही, याची नोंद घ्यावी.

७. उपरोल्लेखित प्रथम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी, औषधनिर्माण, स्थापत्य व विधी अभ्यासक्रम तसेच बी.बी.ए. यासारख्या सी.ई.टी.मार्फत उशिरा प्रवेश होणारे अभ्यासक्रम वगळून) सत्रान्त लेखी परीक्षा **दिनांक ०४.०४.२०२६ पासून** घेण्यात येतील. या परीक्षांचे वेळापत्रक पुढील ७ दिवसांत जाहीर करण्यात येईल.

८. **दिनांक १ ते १६ एप्रिल, २०२६** याच कालावधीत द्वितीय व तृतीय वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी, औषधनिर्माण, स्थापत्य व विधी अभ्यासक्रम तसेच बी.बी.ए. यासारख्या सी.ई.टी.मार्फत उशिरा प्रवेश होणारे अभ्यासक्रम वगळून) प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन करण्यात येत आहे. या संदर्भातील प्रात्यक्षिक परीक्षांचे वेळापत्रक, बहिस्थ परीक्षांची नेमणूक इत्यादी बाबी **२८ मार्चपर्यंत** जाहीर करण्यात येतील. तसेच या अंतर्गत समाविष्ट क्षेत्रीय प्रकल्प **(Field Project)** मूल्यमापन हे अंतर्गत असून बहिस्थ परीक्षक नेमण्यात येवू नयेत. कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेअंतर्गतच्या सत्रान्त प्रात्यक्षिक व लेखी परीक्षांची सविस्तर माहिती या परिपत्रकासोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये नमूद केलेली आहे.

९. अभियांत्रिकी विद्याशाखेअंतर्गत प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक ०५.०५.२०२६ ते १९.०५.२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येतील. याबाबत विद्यापीठाकडून अभ्यासमंडळाच्या सहाय्याने समन्वयकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

१०. स्थापत्य अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा **B.Arch.** प्रथम वर्ष दिनांक ०१.०६.२०२६ ते दिनांक ५.०६.२०२६ पर्यंत व द्वितीय वर्ष **B.Arch.** ते अंतिम वर्ष **B.Arch.** प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २०.०५.२०२६ ते दिनांक ३०.०५.२०२६ मध्ये महाविद्यालय स्तरावर आयोजित कराव्यात.

११. अभियांत्रिकीच्या सत्रान्त लेखी परीक्षा दिनांक २१.०५.२०२६ पासून सुरु होत आहेत. बी.ई./एम.ई./एम.सी.ए.(इंजिनिअरींग) अभ्यासक्रमांच्या प्रोजेक्ट/डीजर्टेशन/सेमिनार इत्यादी परीक्षा लेखी परीक्षेनंतर महाविद्यालय स्तरावर आयोजित कराव्यात. अभियांत्रिकी व स्थापत्य विद्याशाखेअंतर्गतच्या **Practical/oral/Viva-Voce/project/Dissertation** परीक्षांची सविस्तर माहिती या परिपत्रकासोबतच्या **परिशिष्ट-२** मध्ये नमूद केलेली आहे.

१२. औषधनिर्माण विद्याशाखेअंतर्गतच्या सत्रान्त लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांची सविस्तर माहिती या परिपत्रकासोबतच्या **परिशिष्ट-३** मध्ये नमूद केलेली आहे.

१३. विधी विद्याशाखेअंतर्गतच्या सत्रान्त लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांची सविस्तर माहिती या परिपत्रकासोबतच्या **परिशिष्ट-४** मध्ये नमूद केलेली आहे.

१४. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गतच्या **BBA** व **B.Com.(BM/IB/CA)** अभ्यासक्रमांच्या सत्रान्त लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांची सविस्तर माहिती या परिपत्रकासोबतच्या **परिशिष्ट-५** मध्ये नमूद केलेली आहे.

१५. **दि. २१ एप्रिल, २०२६ पासून** बी.ए./बी.कॉम.बी.एस्सी द्वितीय व तृतीय वर्षातील उन्हाळी सत्र २०२६ च्या सत्रान्त लेखी परीक्षा विद्याशाखानिहाय आयोजित केल्या आहेत. याबाबतचे वेळापत्रकही पुढील **७ दिवसांत** जाहीर करण्यात येईल.

१६. प्रथम वर्षातील विद्यापीठ स्तरावर आयोजित परीक्षांच्या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका विद्यापीठ स्तरावरच तयार करण्यात येतील. सर्व विद्याशाखा आणि सर्व अभ्यासक्रमांतील अभ्यासपत्रिकांच्या प्रश्नपत्रिका निमितीची एकत्रित प्रकल्पबैठक **दिनांक १६ ते १८ मार्च, २०२६ आणि दिनांक २३ ते २५ मार्च, २०२६** या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे. ह्याबाबतच्या नियुक्त्या प्राप्त होताच प्राश्निकांनी उपस्थित राहणे अनिवार्य राहील. सर्व संबंधित महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांनी सदर कामकाजाकरिता नियुक्त शिक्षकांचे नियुक्ती आदेश प्राप्त होताच संबंधित शिक्षकांना नमूद कालावधीकरिता तात्काळ कार्यमुक्त करुन विनाविलंब कामकाजाकरिता हजर राहण्याबाबत आदेशित करावे. कोणत्याही महाविद्यालयाने अशा नियुक्तीत परस्पर बदल अथवा संबंधित शिक्षकांना कार्यमुक्त न केल्यास प्रमादअंतर्गत सर्व संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. जर संबंधितांनी नियुक्ती नाकारली तर त्यांना तात्काळ प्रमादसमोर उपस्थित राहावे लागेल.

१७. ज्या राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांचा वा विभागांचा दर्जा परिपत्रक क्रमांक १२५ नुसार ह्याअगोदर निधारित झाला आहे तो तसाच ठेवला असून त्यांच्या परीक्षा अगोदरच्याच पद्धतीनेच आयोजित कराव्यात. (परिपत्रक क्रमांक २२९/२०२५, दिनांक ४.९.२०२५)

१८. पूर्वीच्या व सध्या निरसित केलेल्या परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पूर्वी प्रवेशित सर्व वर्गातील विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या वर्षापासूनच्या परीक्षा अगोदरच्याच प्रचलीत पद्धतीने टप्प्याटप्प्याने त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत महाविद्यालय स्तरावरच आयोजित कराव्यात. याबाबतच्या सर्व प्रकारच्या पूर्वपरवानग्या अनिवार्य आहेत. तसेच या अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पूर्वी प्रवेशित अनुशेष विद्यार्थ्यांच्या परीक्षाही महाविद्यालय स्तरावरच घ्याव्यात.

१९. सारांश, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सर्व विद्याशाखांतील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या पदविका परीक्षा तसेच सर्व मान्यताप्राप्त पारंपारिक अभ्यासक्रमांतील (कला, वाणिज्य व विज्ञान) पदवीस्तरावरील प्रथम वर्षाच्या परीक्षा, तसेच विधी अभ्यासक्रम पदवीस्तरावरील प्रथम वर्षाच्या एलएलबी व बी.ए.एल.एल.बी. परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावरच करण्यात यावे. मात्र उपरोल्लेखित पदविका व प्रथम वर्ष परीक्षांचे वेळापत्रक तयार करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे हे कार्य विद्यापीठ स्तरावर होईल आणि प्रत्यक्ष परीक्षांचे आयोजन करणे व उत्तरपत्रिका तपासणे इत्यादी कामे महाविद्यालय स्तरावर पूर्वीप्रमाणेच होतील.

२०. सर्व विद्याशाखांतील पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षा ते पारंपरिक अभ्यासक्रमातील पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या (कला, वाणिज्य व विज्ञान) अंतर्गतचे परीक्षांचे गुण, मौखिक परीक्षांचे गुण/प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण, तसेच लेखी परीक्षांचे गुण अशा सर्व कार्यांचे नियोजन वेळोवेळी स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळवण्यात येईल.

पारंपरिक अभ्यासक्रमांतील (कला, वाणिज्य, विज्ञान) पदवीस्तर प्रथम वर्ष, विधी अभ्यासक्रम प्रथमवर्ष वगळून ह्या अभ्यासक्रमांची उर्वरित वर्षे तसेच पदव्युत्तरस्तरावरील अभ्यासक्रमांची सर्व वर्षे, तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांची पदवी व पदव्युत्तर स्तरातील सर्व वर्षांच्या अनुरूप सत्रपरीक्षांचे आयोजन विद्यापीठस्तरावरच करण्यात येईल, हे प्रकर्षाने लक्षात घ्यावे.

२१. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व विद्याशाखांतील मान्यताप्राप्त पदविका, तसेच पारंपरिक अभ्यासक्रमांतील पदवीस्तर प्रथम वर्ष (कला, वाणिज्य, विज्ञान) तसेच विधी अभ्यासक्रम प्रथम वर्ष परीक्षांचे मूल्यमापन करण्यासाठी संबंधित महाविद्यालय हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ४८(१)(च) नुसार केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्र (कॅप) म्हणून मान्यता देण्यात येत आहे. संबंधित महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक हे त्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्राचे (कॅप) संचालक म्हणून कामकाज पाहतील.

२२. पारंपरिक मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांतील पदवीस्तर अंतिमपूर्व व अंतिम वर्ष (कला, वाणिज्य व विज्ञान) तसेच विधी अभ्यासक्रमातील एलएलबी पदवीचे अंतिमपूर्व व अंतिम वर्ष आणि बी.ए.एल.एल.बी. पदवीचे दुसरे, तिसरे, चौथे व अंतिम वर्ष; पदव्युत्तरस्तरावरील अभ्यासक्रमांची सर्व वर्षे, व्यावसायिक अभ्यासक्रमांची (विधी वगळून) पदवी व पदव्युत्तर स्तरावरील सर्व वर्षांच्या परीक्षांचे मूल्यमापन **केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प पद्धतीने विद्यापीठस्तरावर** करण्यात येईल. तसेच या अभ्यासक्रमांच्या केंद्रीय मूल्यमापन केंद्रांबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागामार्फत स्वतंत्रपणे अवगत करण्यात येईल.

२३. तसेच विद्यापीठ आयोजित उन्हाळी सत्र परीक्षा-२०२६ च्या ओपन ईलेक्टीव विषयांच्या उत्तरपत्रिका जमा करण्याची कार्यपद्धती खालील उदाहरणाप्रमाणे राहील.

| **विद्यार्थी ज्या परीक्षेस बसला आहे ती परीक्षा व विद्याशाखा** | **विद्यार्थ्यांने निवडलेल्या ओपन ईलेक्टीव विषयाची विद्याशाखा** | **उत्तरपत्रिका जमा करावयाचे कॅप सेंटर** |
|---|---|---|
| एस.वाय.बी.ए., २०२४ पॅटर्न, मानवविज्ञान विद्याशाखा | वाणिज्य | वाणिज्य विद्याशाखेअंतर्गतच्या परीक्षांकरिता नियुक्त कॅप सेंटर |

२४. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाअंतर्गत मुल्यांकनाच्या कामकाजाकरिता नियुक्त केलेले शिक्षक संबंधित कॅप सेंटरवर कामकाजाकरिता हजर होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ८९ द्वारे परीक्षांचे निकाल परीक्षेच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जाहीर करण्याची तरतूद विहित करण्यात आलेली आहे. तसेच कलम ४८(४) मध्ये परीक्षेच्या कामकाजाकरिता सहाय्य करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

***"विद्यापीठ, संलग्न, संचालित महाविद्यालये, समूह महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या प्रत्येक अध्यापकावर आणि अध्यापकेतर कर्मचाऱ्यावर, विद्यापीठाच्या परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन यांबाबत परिनियमाद्वारे विहित केल्याप्रमाणे आवश्यक ते सहाय्य आणि सेवा देणे बंधनकारक आहे. याबाबत विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या आदेशाचे अनुपालन करण्यात कोणत्याही अध्यापकाने किंवा अध्यापकेतर कर्मचाऱ्याने कसूर केल्यास, ती गैरवर्तणूक असल्याचे समजण्यात येईल आणि तो कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईसाठी पात्र असेल."*** याबाबत सर्व संबंधित महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांनी केंद्रीय मूल्यमापन केंद्राच्या कामकाजाकरिता नियुक्त शिक्षकांचे नियुक्ती आदेश प्राप्त होताच संबंधित शिक्षकांना नमूद कालावधीकरिता तात्काळ कार्यमुक्त करुन विनाविलंब कॅप सेंटरवर हजर राहण्याबाबत आदेशित करावे. कोणत्याही महाविद्यालयाने अशा नियुक्तीत परस्पर बदल अथवा संबंधित शिक्षकांना कार्यमुक्त न केल्यास प्रमादअंतर्गत सर्व संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. हिवाळी सत्र २०२५ च्या परीक्षा मूल्यमापनास अनुपस्थित असलेल्या सर्वांची प्रमाद प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, याचीही नोंद घ्यावी.

२५. उन्हाळी सत्र २०२६ च्या सत्रपरीक्षांकरिता महाविद्यालय/परिसंस्थांकडून अनुरुप विविध सत्रांतर्गत गुण स्वीकारण्याच्या प्रणालीमध्ये परीक्षा विभागाद्वारे सुरक्षित व संरक्षित तपशीलांसह एक्सेल शीट उपलब्ध करुन

देण्यात येतील आणि पुरविण्यात आलेल्या एक्सेल शीटमध्येच अंतर्गत गुणांची नोंद करुन सदर एक्सेल शीट विद्यापीठाच्या सुरक्षित व संरक्षित अंतर्गतगुणप्रणालीमध्ये अपलोड करण्यात यावी.

**२६.** सर्व महाविद्यालये/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांनी परीक्षार्थीच्या बैठकव्यवस्थेचे नियोजन काटेकोरपणे व नियमानुसार करावे. तसेच अनुरूप हवा व उजेडासाठी पर्याप्त पंखे व वीजव्यवस्था करण्यात यावी.

**२७.** महाविद्यालयांमध्ये जर आवश्यक बैठकव्यवस्थेकरिता साधने उपलब्ध नसतील तर संबंधित प्राचार्यांनी तात्पुरत्या व्यवस्थेची सोय करावी. त्यात कुचराई करू नये. विद्यापीठ नियमाप्रमाणे बैठकव्यवस्था करण्याची जबाबदारी संपूर्णपणे महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक ह्यांची प्रामुख्याने आणि पर्यायाने परीक्षा अधिकारी यांची राहील.

**२८.** महाविद्यालयाच्या इमारतीत केवळ वरच्या मजल्यांवर परीक्षा घेण्याची व्यवस्था ठळकपणे लक्षात येत आहे. ह्यामुळे सर्वप्रथम तळमजला व क्रमाने वरील मजले परीक्षेसाठी वापरावेत. अन्यथा ह्याबाबत परीक्षा आयोजनातील दोष मानून कारवाई करण्यात येईल.

**२९.** परीक्षाकेंद्रावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या वस्तू ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत मोबाईल/तत्सम उपकरणे परीक्षाकक्षामध्ये आणणे, हे नियमबाह्य व आक्षेपार्ह आहे. आपण ह्याबाबत जागृती करावी व खबरदारी घ्यावी. मोबाईल/उपकरणे हरविल्यास/चोरी/ गहाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल ह्यासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जागृती करावी. याबाबत संबंधित परीक्षा अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. अशा कोणत्याही गैरप्रकार आढळास महाविद्यालय जबाबदार राहील आणि परीक्षाकेंद्र म्हणून असलेला दर्जा निलंबित होईल.

**३०.** दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे परीक्षाकेंद्रावरच्या सोयी सवलती देय राहतील. या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी प्रति तास अधिकचा वेळ परिपत्रक ४४६/२०२५, जा.क्र.११८१, दिनांक ०३.१२.२०२५ प्रमाणे देय राहील. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता तळमजल्यावर विशेष खोलीची व्यवस्था करण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार त्यांना लेखनिक व इतर सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. ह्याबाबत प्राचार्य, वरिष्ठ पर्यवेक्षक आणि परीक्षा अधिकारी ह्यांनी आत्यंतिक संवेदनशीलतेने कार्य करावे. ह्यासंदर्भात परीक्षा अर्जात केलेले बदल आणि त्याबाबतची कार्यवाही दक्षतेने करावी.

**३१.** दिव्यांग परीक्षार्थीच्या उत्तरपत्रिका स्वतंत्रपणे जमा करुन सबंधित मूल्यनिर्धारण केंद्रावर स्वतंत्रपणेच जमा कराव्यात.

**३२.** विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे. याबाबतच्या पूर्वसूचना संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना द्याव्यात. प्रश्नपत्रिका विहित वेळेपूर्वी कक्षाबाहेर जाणे बेकायदेशीर असून ह्याबाबत अनुषंगिक परिपत्रकांचे अनुपालन करावे.

**३३.** सदर परीक्षांदरम्यान कोणत्याही विद्यार्थ्यांने गैरप्रकार केल्याचे आढळून आल्यास सदर विद्यार्थी हा विद्यापीठ अध्यादेश क्र.०९ नुसार कारवाईस पात्र असेल. तसेच वेळोवेळी केंद्रशासन व राज्यशासन यांनी निर्गमित केलेले कायदे (IT Act 2000, Section 66) ह्यानुसारही गैरप्रकार करणारे विद्यार्थी कारवाईस पात्र असतील.

**३४.** इमर्जन्सी बारकोड असाधारण परिस्थितीत आणि केवळ पूर्वपरवानगीनेच वापरण्यात यावेत. परीक्षा अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना इमर्जन्सी बारकोडवरुन परीक्षेस बसविणे हा दखलपात्र गुन्हा असून त्याबाबत संबंधितावर कारवाई होऊ शकते, याची नोंद कृपया घ्यावी. याबाबत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक तसेच परीक्षा अधिकारी यांनी विशेष दक्षता घ्यावी.

३५. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाच्या नियमित परीक्षा आणि परिपत्रक १०४/२०२२ मध्ये नमूद विद्यापीठेतर संस्थांच्या परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास, तसेच याशिवाय सदर परिपत्रकात नमूद क्र.१ ते ५ कारणांकरिता विशेष परीक्षा आयोजनाची कार्यवाही करण्यात येईल. ह्याबाबतचे परीक्षा अर्ज संबंधित परीक्षा संपल्यानंतर १० दिवसांच्या आत अग्रेषित करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची असेल.

३६. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्र (कॅप) आयोजनासाठी निवडलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक ह्यांनी परीक्षेच्या प्रारंभापासून दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प सुरु करावा. याबाबतच्या सूचनावलीचे पत्र स्वतंत्रपणे परीक्षा-छाननी व तालिनीकरण कक्षामार्फत संबंधित महाविद्यालयांना पाठविण्यात येईल.

३७. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार हिवाळी सत्र परीक्षा २०२५ च्या आयोजनासाठी संबंधित महाविद्यालयांचे परीक्षा केंद्रांचे लेखा परीक्षण करण्यात येत असून केवळ नवीन महाविद्यालयांनी परिपत्रक क्र.१२४ दिनांक ०९.०६.२०१० नुसार सादर केलेल्या परीक्षा केंद्राच्या प्रस्तावाबाबत परीक्षा विभागाद्वारे नियुक्त समिती भेट देईल आणि समितीने सादर केलेल्या अहवालावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३८. ज्या महाविद्यालयांमध्ये सबळ/सक्षम व स्वीकारार्ह पर्याप्त कारणांमुळे परीक्षा आयोजन करणे शक्य नसेल अशा महाविद्यालयांनी जवळच्या महाविद्यालयात परीक्षा आयोजनाबाबतचा पत्रव्यवहार विनाविलंब परीक्षा विभागाकडे सादर करावा. प्रस्ताव सादर करताना दुसऱ्या महाविद्यालयाचे "ना-हरकत प्रमाणपत्र" जोडणे अनिवार्य आहे.

३९. भरारी पथक सदस्य/वरिष्ठ बाह्य पर्यवेक्षक/स्थायी निरीक्षक ह्या स्वरूपात परीक्षा आयोजनाबाबत परीक्षा विभागाकडून वेळोवेळी जे आदेश प्राप्त होतील, त्या महाविद्यालयीन अध्यापकांनी, अध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी परीक्षाविषयक आवश्यक ते सहाय्य व सेवा देणे हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ४८(४) नुसार बंधनकारक आहे. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी/परिसंस्थेच्या संचालकांनी अशा अध्यापकांना/अध्यापकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठस्तर परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापनविषयक सर्व कामकाजांसाठी नमूद कालावधीकरिता तात्काळ कार्यमुक्त करणे आणि ह्याबाबतच्या नियुक्त्या प्राप्त होताच विनाविलंब त्या त्या सेवेत हजर राहणे अनिवार्य आहे. कोणत्याही महाविद्यालयाने अशा नियुक्तीत परस्पर बदल केला तर ह्याबाबत प्रमादअंतर्गत कारवाई करण्यात येईल.

४०. सदर परीक्षेवेळी संबंधित परीक्षाकेंद्रांना योग्य वेळी ऑनलाईन पद्धतीने प्रश्नपत्रिका प्राप्त झाली नाही, तर परीक्षा अधिकारी ह्यांनी ०२०-२५६२१४५३ या दूरध्वनी क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा. प्रश्नपत्रिकेबाबत आपल्याच स्तरावर परस्पर कार्यवाही करणाऱ्या आणि नियमोल्लंघन करणाऱ्या महाविद्यालयावर परीक्षा केंद्र निलंबनाची कारवाई करण्यात येईल.

४१. महाविद्यालय प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक, परीक्षा अधिकारी ह्यांनी आपले मोबाईल क्रमांक परीक्षा कामकाजाकरिता अद्ययावत करावेत. हे संपर्क क्रमांक सतत संपर्कयोग्य असावेत. तसेच परीक्षा अधिकारी यांची नेमणूक दिनांक २ एप्रिल, २०२६ पूर्वी केलेली असावी.

४२. जर संबंधित परीक्षा केंद्रांना परीक्षा आयोजन करण्यासाठी उत्तरपत्रिका व इतर आवश्यक साधनसामुग्री प्राप्त झाली नाही तर त्यांनी ०२०-२५६२१४६०/२५६२१४६२ या क्रमांकावर संपर्क साधून परीक्षा गोदाम कक्षातून आवश्यक साधनसामुग्री घेऊन जाण्याची व्यवस्था करावी.

४३. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार (सुधारित अध्यादेश क्र. १८४ अ व ब) **सत्र पुर्तता झालेल्या विद्यार्थ्यांकरिताच्या हिवाळी सत्र २०२५ च्या परीक्षांसाठी व उन्हाळी सत्र, २०२६ परीक्षांसाठी** छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा लागू राहील.

४४. संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक तसेच परीक्षा अधिकारी ह्या सर्वांनीच उपरोक्त मार्गदर्शक तत्त्वे व सूचनाचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयीन/परिसंस्थेतील सर्व अध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे आणि त्यांच्या शंकांचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

(प्रा.डॉ.प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

परीक्ष समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र. १९२, दिनांकः १४.०३.२०२६

**प्रति,**
**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था**
**पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, नाशिक जिल्हा व दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश**

Annexure-I

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE
# EXAMINATION COORDINATON SECTION

## SUMMER SESSION SEMESTER EXAMINATION SCHEDULE 2026

| Sr. No. | Name of Program | Year | Pattern | IE/ Continuous Internal Evaluation (CIE) | | External Evaluation | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Practical/Viva-Voce/Theory, etc. | Conduction Level | Practical/ Viva-Voce, etc. | Theory | Conduction Level |
| 1. | U.G. Program (Arts,Com.,Sci.-Backlog Student) | I | All | 16/03/2026 onwards | College | 16/03/2026 To 31/03/2026 | 01/04/2026 To 16/04/2026 | College |
| 2. | All U.G. Program (Except- Engineering, Pharmacy, law and Architecture) | I (Including the backlog students' exams of Sem-I, enrolled in the A.Y. 2025-26) | All | 16/03/2026 onwards | College | 16/03/2026 To 31/03/2026 | 01/04/2026 To 16/04/2026 | University |
| 3. | All U.G. Program (Except- Engineering, Pharmacy and Architecture) | II/III and IV/V (Integrated Courses) | All | Till 01/04/2026 | College | 04.04.2026 To 16/04/2026 | 21/04/2026 Onwards | University |
| 4. | Other than above program | As per tentative examination schedule & academic calendar | | | | | | |

Prof. (Dr.) Prabhakar Desai
Officiating Director
Board of Examinations and Evaluation

**Annexure-II**

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE
## EXAMINATION COORDINATON SECTION

**Summer Session 2026 Examination Schedule (PRACTICAL & ORAL) for the Academic Year 2025-2026**
**Faculty of Science & Technology : Engineering & Architecture**

| Sr. No. | Name of the Examination Under Engineering U.G., P.G. Program | Date of the Practical/oral/Viva-Voce/project/Dissertation |
|---|---|---|
| 1) | S.E., T.E., B.E., M.E., M.C.A. All Pattern | 05/05/2026 To 19/05/2026 |
| 2) | B.E., M.E., MCA Project/ Dissertation | after theory exam within 15 days |
| 3) | First year B. Architecture | 01/06/2026 to 05/06/2026 |
| 4) | Second year B. Architrcture to final year B. Architecture | 20/05/2026 to 30/05/2026 |
| 5) | Other than above program | As per tentative examination schedule & academic calendar |

**Prof. (Dr.) Prabhakar Desai**
**Officiating Director**
**Board of Examinations and Evaluation**

**Annexure-III**

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE
# EXAMINATION COORDINATON SECTION

## Summer Session 2026 Examination Schedule for the Academic Year 2025-2026
## Faculty of Science & Technology : Pharmacy

| Sr. No. | Course, Program, Year | Semester | Tentative Examination Date | |
|---|---|---|---|---|
| | | | Practical | Theory |
| 1) | **Second Year, B. Pharm.** | Sem-III, IV | **22-06-2026 To 02-07-2026** | **07-07-2026 To 18-07-2026** |
| 2) | **Third Year, B. Pharm.** | Sem-V, VI | **20-05-2026 To 31-05-2026** | **02-06-2026 To 15-06-2026** |
| 3) | **Final Year, B. Pharm.** | Sem-VII, VIII | **20-05-2026 To 31-05-2026** | **02-06-2026 To 15-06-2026** |
| 4) | **Second Year, M. Pharm.** | Sem-III, IV | **22-06-2026 * To 31-07-2026 (Viva Voce Date)** | |
| 5) | **Pharm D.** | II,III,IV | **22-06-2026 To 02-07-2026** | **07-07-2026 To 18-07-2026** |

*ALL THE COLLEGES ARE INFORMED THAT TO CODNCUT EXAMINATION FOR THE SECOND YEAR M PHARMACY WITHIN MENTIONED DATE FOR VIVA VOCE EXAMINATION.

**Prof. (Dr.) Prabhakar Desai**
**Officiating Director**
**Board of Examinations and Evaluation**

Annexure-IV

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE
## EXAMINATION COORDINATON SECTION

## Summer Session 2026 Examination Schedule for the Academic Year 2025-2026
## Faculty of Humanities : Law

| Sr. No. | Program | Course/Program/Year | Tentative Examination Date | |
|---|---|---|---|---|
| | | | Practical | Theory |
| 1) | UG | Second & Third Year LL.B (2023 Pattern) | 10/4/2026 to 18/4/2026 | 20/04/2026 onward |
| 2) | | Second To Fifth Year BA LL.B, (2023 Pattern) | 10/4/2026 to 18/4/2026 | 20/04/2026 onward |
| 3) | | Second To Fifth Year BBA LL.B, (2023 Pattern) (under 125) | 10/4/2026 to 18/4/2026 | 20/04/2026 onward |
| 4) | | First Year to Third Year LL.B (2017 Pattern) | 10/4/2026 to 18/4/2026 | 20/04/2026 onward |
| 5) | | First Year to Fifth Year BA LL.B (2017 Pattern) | 10/4/2026 to 18/4/2026 | 20/04/2026 onward |
| 6) | | First Year to Fifth BBA LL.B (2017 Pattern) (Under 125) | 10/4/2026 to 18/4/2026 | 20/04/2026 onward |
| 7) | | First Year, LLB (2023 pattern) | - | 12/5/2026 onwards |
| 8) | | First Year, BA LL.B (2023 pattern) | - | 12/5/2026 onwards |
| 9) | | First Year, BBA LL.B (2023 Pattern) | - | 12/5/2026 onwards |
| 10) | Diploma | Diploma in Labour Laws and Labour Welfare | 6/4/2026 to 9/4 2026 | 10/4/2026 onward |
| 11) | | Diploma in Taxation Laws | 6/4/2026 to 9/4 2026 | 10/4/2026 onward |
| 12) | | Diploma in Cyber Laws | 6/4/2026 to 9/4 2026 | 10/4/2026 onward |
| 13) | | Diploma in Intellectual Property Rights Laws | | 10/4/2026 onward |
| 14) | | Diploma in Forensic Science and Medical Jurisprudence | | 10/4/2026 onward |
| 15) | | Diploma in Human Rights and International Law | | 10/4/2026 onward |
| 16) | | Diploma in Consumer Protection Laws | | 10/4/2026 onward |
| 17) | | Diploma in Alternative Dispute Resolution | | 10/4/2026 onward |
| 18) | PG | LL.M, Sem-I and II, (2025 Pattern) | - | 20/04/2026 onward |
| 19) | | First and Second Year LL.M (2014 Pattern) | - | 20/04/2026 onward |

**Prof. (Dr.) Prabhakar Desai**
**Officiating Director**
**Board of Examinations and Evaluation**

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE
# EXAMINATION COORDINATON SECTION

## Summer Session 2026 Examination Schedule for the Academic Year 2025-2026
## Faculty of Commerce & Management

| Sr. No. | Examination | Practical | Theory |
|---|---|---|---|
| 1) | SYBBA/IB/CA (2024 pattern - Regular + Backlog) | 20 April 2026 to 2 May 2026 | 4 May 2026 onwards |
| 2) | FYBBA/IB/CA (2024 pattern - Regular + Backlog) | 25 May 2026 to 30 May 2026 | 1 June 2026 onwards |
| 3) | SYBCA(Management) (2024 pattern - Regular + Backlog) | 20 April 2026 to 2 May 2026 | 4 May 2026 onwards |
| 4) | FYBCA(Management) (2024 pattern - Regular + Backlog) | 25 May 2026 to 30 May 2026 | 1 June 2026 onwards |
| 5) | SYBBA/IB/CA (2019 pattern - Backlog) | 20 April 2026 to 2 May 2026 | 4 May 2026 onwards |
| 6) | TYBBA/IB/CA (2019 pattern - Regular + Backlog) | 20 April 2026 to 2 May 2026 | 4 May 2026 onwards |
| 7) | FYBCOM-BM/IB/CA (2024 pattern - Regular + Backlog) | 16 March 2026 to 31 March 2026 | 1 April 2026 onwards |
| 8) | SYBCOM-BM/IB/CA (2024 pattern - Regular + Backlog) | 04 April 2026 to 16 April 2026 | 21 April 2026 onwards |

**Prof. (Dr.) Prabhakar Desai**
**Officiating Director**
**Board of Examinations and Evaluation**